प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे व उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी चिंचवड या कार्यालयाच्या वाहन तपासणीचे चित्रिकरण करण्यासाठी पुरविण्यात आलेल्या व्हिडीओ रेकॉर्डिंग व व्हिडीओ रेकॉर्डिस्ट यासाठी झालेल्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः एमव्हीडी-०३१९/प्र.क्र.७९/परि-४
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक : १६ एप्रिल २०१९

<u>वाचा :-</u>

१) जनहित याचिका क्र.२८/२०१३ प्रकरणी मा. मुंबई उच्च न्यायालयाने दि.१८.०२.२०१६ रोजी दिलेले आदेश
२) गृह (परिवहन) विभाग, शासन ज्ञापन क्र. एमव्हीडी-०६१६/प्र.क्र.३६९/परि-४, दि.०४.०७.२०१६ व दि. ११.११.२०१६
३) अपर परिवहन आयुक्त, परिवहन आयुक्त कार्यालय,मुंबई यांचे पत्र क्र.PIL२८/२०१३-CCTV/०२१६/न.क्र.०४/का१०(१) /जा.क्र.२९९७, दि.०७.०३.२०१९
४) परिवहन उप आयुक्त (निरीक्षण), परिवहन आयुक्त कार्यालय,मुंबई यांचे पत्र क्र.PIL२८/२०१३- CCTV/०२१६/न.क्र.०४/का१०(१) /जा.क्र.३४८०, दि.१६.०३.२०१९

<u>प्रस्तावना :-</u>

जनहित याचिका क्र.२८/२०१३ प्रकरणी मा. मुंबई उच्च न्यायालयाने दि.१८.०२.२०१६ रोजी योग्यता प्रमाणपत्र देण्यासाठी आणि त्याचे नूतनीकरणासाठी वाहतुकीच्या वाहनांशी संबंधित सर्व चाचण्यांचे रेकॉर्डिंग करण्यासाठी व्हिडिओ कॅमेरे बसविण्यात यावेत व प्रत्येक वाहनाच्या चाचणीचे व्हिडिओ फुटेज जतन करण्याची व्यवस्था करावी असे आदेश दिले आहेत. मा. उच्च न्यायालयाच्या सदर आदेशाच्या अनुषंगाने मोटार वाहन विभागाच्या कार्यालयांमध्ये वाहन तपासणीच्या रेकॉर्डिंगसाठी सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वीत करण्यास संदर्भ क्र. २ वरील दि.०४.०७.२०१६ व दि.११.११.२०१६ रोजीच्या शासन ज्ञापनान्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिली आहे.

जनहित याचिका क्र.२८/२०१३ प्रकरणी दि. २३.०८.२०१७ रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी सध्याची व्हिडीओ रेकॉर्डिंग पध्दती समाधानकारक नसल्यामुळे व्हिडीओ रेकॉर्डिंगसाठी वेगळी व्यक्ती नेमून व्हिडीओ रेकॉर्डिंग करावे असे तोंडी निर्देश दिले आहेत. त्यानुषंगाने परिवहन आयुक्त कार्यालयाने वाहन तपासणीच्या सर्व चाचण्यांचे व्हिडीओ रेकॉर्डिंग करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या व्हिडीओ रेकॉर्डिस्ट यांच्या सेवा भाडेतत्वावर घेण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यानुसार प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे व उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड या कार्यालयांना वाहन तपासणीच्या कामकाजाचे व्हिडीओ रेकॉर्डिंग करण्यासाठी मे. रोहित एंटरप्राईझ,

पुणे यांचे मार्फत सीसीटीव्ही यंत्रणा व रेकॉर्डिस्ट पुरविले आहेत. सदर व्हिडीओ रेकॉर्डिंग व व्हिडीओ रेकॉर्डिस्ट यांचेसाठी झालेल्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय: -

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे व उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी-चिंचवड या कार्यालयांना वाहन तपासणीच्या कामकाजाचे व्हिडीओ रेकॉर्डिंग करण्यासाठी झालेल्या रु. ३६,४८,१५६/- (अक्षरी रुपये छत्तीस लक्ष अठ्ठेचाळीस हजार एकशे छप्पन फक्त) इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. त्याबाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

अ.क्र.	कार्यालयाचे नाव	कालावधी	रक्कम (रुपये)
१	प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे (आळंदी रोड,फुलेनगर व सासवड दिवे येथील वाहन तपासणी)	मार्च २०१८ ते मे २०१८	९,८४,२१०/-
२	प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे (मोशी येथील रिक्षा वाहन तपासणी)	एप्रिल२०१८ ते फेब्रुवारी २०१९	४,४३,३९८/-
३	उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी चिंचवड	फेब्रुवारी २०१८ ते जुलै २०१८	२२,२०,५४८/-
		एकुण	**३६,४८,१५६/-**

२. यासाठी येणारा खर्च हा " मागणी क्र. बी-३, २०४१ वाहनांवरील कर, (०२) प्रादेशिक कार्यालये, (०२) (०१) प्रादेशिक कार्यालये (दत्तमत) (अनिवार्य) (२०४१ ००३६) १३ कार्यालयीन खर्च " या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता उपलब्ध असलेल्या मंजूर अनुदानातून खर्ची टाकण्यात यावा.

३. सदरहू शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग पहिला, उपविभाग चार, अनुक्रमांक ११ मधील अटींच्या पूर्ततेच्या अधिन प्रशासनिक विभागासअसलेल्या पूर्ण अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०४१६१७२०२४५२२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KADAM DATTATRAY HANMANT

Digitally signed by KADAM DATTATRAY HANMANT
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=cf316337e92d3c54da432222208093bfc6ed1d1570f094663515273d0b4d27fc, postalCode=400032, street=HOME DEP.MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=a923979cf886d5724fbed87cd57745c3f72eba57b0d277f11e970f0aaca99802, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=KADAM DATTATRAY HANMANT
Date: 2019.04.16 17:28:18 +05'30'

(द.ह.कदम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
३. मा.राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव
४. महालेखापाल (लेखापरीक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
५. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. परिवहन उप आयुक्त (निरीक्षण/संगणक/लेखा) परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई
७. प्रादेशिक परिवहन अधिकारी ,पुणे
८. उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी चिंचवड
९. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
१०. अवर सचिव (बीयुडी-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
११. निवड नस्ती (परिवहन-४).